FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोतवाली
FIR No.(प्रथम खबर क्र.): 1325 **Year (वर्ष):** 2024
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/12/2024 01:46

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7(a)
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	12

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 13/12/2024
Date To (दिनांक पर्यंत): 17/12/2024
Time From (वेळेपासून): 12:53 बजे
Time To (वेळेपर्यंत): 15:13 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 18/12/2024 **Time (वेळ):** 01:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 004
Date & Time (दिनांक आणि वेळ): 18/12/2024 01:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जीकेएन्टरप्रायजेस कार्यालय,वाडियापार्क, अहिल्यानगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): किरण कानिफनाथ आरगडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2002

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	सौंदाळा, ता नेवासा, ,अहिल्यानगर,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	सौंदाळा, ता नेवासा, ,अहिल्यानगर,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-7775940775

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	प्रदिप उर्फ विशाल विष्णु देवतरसे			1. घर नं272,,राजेश्वरसोसायटी, मोहिनीनगर,केडगाव, अहिल्यानगर,,कोतवाली, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत
2	विनोद बाबासाहेब दळवी			1. दळवीनिवास,राममंदिरामागे,, भूषणनगर,केडगाव,अहिल्यानगर, ,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत

3	अंबादास मनोहर कदम			1. वाडिया पार्क, अहिल्यानगर , कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	15,000/रुपये त्यात 500/ रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा	15,000.00

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये))**:**

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास))**:**

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत)**:**

फिर्याद दि. 17/12/2024

मी, किरण कानिफनाथ आरगडे, वय 22 वर्शे, धंदा नोकरी, बाहयस्रोत यंत्रचालक, 33/11 के.व्ही. खडका उपकेंद्र, कक्ष प्रवरा संगम, महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्या. उपविभाग नेवासा, जि.अहिल्यानगर, रा. सौंदाळा, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर, 7775940775

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि.13/12/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयात येवुन पोलीस उप अधीक्षक श्री.अजित त्रिपुटे यांना एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी कार्यालयात हजर असलेले दोन षासकिय पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांना त्यांचे कार्यालयीन कक्षात बोलवुन घेतले. श्री. त्रिपुटे यांनी पंचांषी व सापळा पथकाषी माझी ओळख करून दिली. श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी मला माझे नाव व तक्रार विचारली असता मी माझे नाव वरिलप्रमाणे सांगुन तक्रार सांगितली की, मी जुलै 2021 पासुन पुजा इलेक्ट्रीकल्स, इंजिनिअर अँण्ड कॉन्ट्रॅक्टर या कंपनीच्या मार्फतीने बाहयस्रोत यंत्रचालक म्हणुन 33/11 के.व्ही. खडका उपकेंद्र, कक्ष प्रवरा संगम, ता.नेवासा या ठिकाणी म.रा.वि.वि.कंपनी अंतर्गत कामकाज करत होतो. त्यानंतर फेब्रुवारी 2024 ते 05/12/2024 पावेतो मी श्री.गणेश इंडस्ट्रियल सर्विसेस या कंपनीच्या मार्फतने बाहयस्रोत यंत्रचालक म्हणुन खडका उपकेंद्र, कक्ष प्रवरा संगम येथे कामकाज केले. म.रा.वि.वि.कंपनीने दि.05/12/2024 रोजी पासुन बाहयस्रोत कर्मचारी भरण्याचे कॉन्ट्रॅक्ट हे जी.के.एंटरप्रायजेस,अहिल्यानगर चे प्रोप्रायटर श्री.अंबादास कदम यांना दिले आहे.मी दिनांक 12/12/2024 रोजी माझा बाहयस्रोत यंत्रचालक म्हणुन नियुक्तीचा आदेश घेण्याकरीता जी. के. एंटरप्रायजेस यांचे अहिल्यानगर येथील कार्यालयात गेलो होतो.तेथे मी माझ्या नियुक्तीच्या आदेशाची मागणी केली असता जी.के.एंटरप्रायजेस चे प्रोप्रायटर श्री.अंबादास कदम यांचे कार्यालयातील खाजगी कर्मचारी श्री.विशाल देवतरसे व विनोद दळवी यांनी कळविले की,नियुक्तीचा आदेश देण्याकरीता श्री.कदम साहेब यांनी 11महिन्यांचे एकत्रीत 15,000/-रुपये घेतल्याशिवाय नियुक्ती आदेश देवु नका असे सांगितले असल्याचे कळविले.नियुक्ती आदेश देण्याकरीता पैशाची आवश्यकता नसल्याचे मला माहित आहे.नियुक्तीचा आदेश देण्याकरीता जी.के.एंटरप्रायजेस चे

प्रोप्रायटर कदम यांचे सांगण्याप्रमाणे त्यांचे कार्यालयातील खाजगी कर्मचारी श्री.देवतरसे व श्री.दळवी हे माझेकडे श्री. कदम यांचेकरीता 15,000/-रुपये लाचेची मागणी करत असल्याचे मला समजले.मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.मी आज रोजी जी.के.एंटरप्रायजेसचे अहिल्यानगर येथील कार्यालयात जावुन प्रोप्रायटर श्री.कदम यांचे कार्यालयातील खाजगी कर्मचारी श्री.देवतरसे व श्री.दळवी यांची भेट घेवुन त्यांचेशी माझ्या नियुक्तीच्या आदेशाबाबत चर्चा करणार आहे.त्यावेळी त्यांनी नियुक्तीचा आदेश देण्याकरीता जी.के.एंटरप्रायजेसचे प्रोप्रायटर कदम यांचेकरीता लाचेची मागणी केल्यास मी त्यांना माझी कदम साहेबांशी भेट घालुन दया अशी विनंती करणार आहे.त्यांनी कदम यांचेशी भेट घालुन दिल्यावर मी श्री.कदम यांचेशी माझे नियुक्तीचा आदेश देण्याबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी.माझ्यात व श्री.कदम,त्यांचे खाजगी कर्मचारी श्री.देवतरसे आणि श्री. दळवी यांचेत कुठल्याही प्रकारचा आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही.तसेच आमच्यात भांडणतंटा अगर वैर नाही.श्री.कदम,त्यांचे खाजगी कर्मचारी श्री. देवतरसे आणि श्री.दळवी यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करीन.आता मी पुजा इलेक्ट्रीकल्स,इंजिनिअर अँण्ड कॉन्ट्रॅक्टर व श्री.गणेश इंडस्ट्रियल सर्विसेस या कंपनीकडील नियुक्ती आदेशाच्या छायांकित प्रती हजर करत आहे. अशी तक्रार सांगीतली.श्री.त्रिपुटे यांनी सदर तक्रार मला माझे स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगीतली असता मी ती लिहुन दिली त्यावर मी,श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले.श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉंर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली.

त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे,दोन्ही पंच व मी निवेदन केले.त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला.श्री.त्रिपुटे यांनी मला व पंच नं.1 यांना माझेकडील मोटार सायकलने 12/53 वा.रवाना केले.त्यानंतर मी व पंच नं.1 असे जी.के. एन्टरप्रायजेसचे वाडियापार्क येथील कार्यालयात गेलो.तेथे खाजगी कर्मचारी देवतरसे व दळवी हे हजर होते.देवतरसे यांनी मला एक फॉर्म देवुन तो भरण्यास सांगितला.देवतरसे व दळवी यांनी मला ''तुम्ही महिन्याला किती दयायचे तिथे,दोन ना... इथ आपल्याला बारा महिन्याचे वन टाईम पंधरा दयायचे,वर्षभर यायचं नाही... असे म्हणुन नियुक्तीचा आदेश देण्याकरीता माझ्याकडे जी.के.एन्टरप्रायजेसचे प्रोप्रायटर श्री.कदम यांचेकरीता 15,000/-रुपये लाचेची मागणी केली.मी देवतरसे व दळवी यांना साहेबांशी बोलणे कधी होईल व पैसे कधी दयावे लागतील असे विचारले असता त्यानी मंगळवारी,बुधवारी ये असे सांगितले.त्यानंतर मी कदम यांना फोन केला व देवतरसे व दळवी यांनी ऑफर दिली,मग ते त्यांच्याकडे जमा करायचे का असे विचारले असता कदम यांनी ठिक आहे,कुणी ऑफर दिली,मी बोलतो त्यांच्याशी असे म्हणुन फोन कट केला.त्यानंतर मी व पंच नं.1 असे तेथुन निघुन ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो.त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले.

त्यानंतर मी व पंच नं.1अशानी वरील प्रमाणे हकिकत पोउपअधी श्री.त्रिपुटे यांना सांगितली.त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी पंचा समक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले असता,लाचमागणी पडताळणी दरम्यान जी.के. एन्टरप्रायजेसचे कार्यालयातील खाजगी कर्मचारी देवतरसे व दळवी यांनी माझ्याकडे माझा बाहयस्रोत यंत्रचालक म्हणुन नियुक्ती आदेश देण्याकरीता जी.के.एन्टरप्रायजेस चे प्रोप्रायटर श्री.कदम यांचेकरीता 15,000/-रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.देवतरसे व दळवी यांनी मला मंगळवारी,बुधवारी ये असे सांगितल्याने त्यांचेविरूध्द मंगळवार दि.17/12/2024 रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले.

दि.17/12/2024 रोजी मी दुपारी सव्वादोन वाजेदरम्यान ला.प्र.वि.कार्यालयात हजर झालो.श्री.त्रिपुटे यांनी मला देवतरसे व दळवी यांना देण्याकरीता लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी माझ्या बचतीतुन 15,000 /-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. त्यावेळी श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले.मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले.त्यानंतर त्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली.त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्या नंतरचा नियोजीत इशारा ठरवुन दिला.त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले.त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व पंच क्र.1 सह मला माझे दुचाकी वाहनाने जी.के.एन्टरप्रायजेस

कार्यालय,वाडियापार्क येथे जाण्यासाठी 15/13 वा. रवाना केले.त्याप्रमाणे मी व पंच 1असे सदर कार्यालयाजवळ गेलो.आमचे पाठोपाठ श्री.त्रिपुटे हे सापळा पथकासह शासकिय वाहनाने आले व जी.के.एन्टरप्रायजेस कार्यालयाजवळ सापळा लावुन थांबले.आम्ही कार्यालयाजवळ गेलो तेव्हा कार्यालय बंद होते.आम्ही बराच वेळ कार्यालय उघडण्याची वाट पाहिली.थोडया वेळाने देवतरसे तेथे आले.त्यांनी कार्यालय उघडले.मी व पंच 1 असे देवतरसेच्या पाठोपाठ कार्यालयात गेलो.तेथे माझेत व देवतरसे यांचेत माझे ऑर्डरसंबंधाने बोलणे झाले.देवतरसे यांनी मला पेमेंटचे काय झाले असे विचारले असता मी त्यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे 15,000/-रुपये आणले आहेत असे म्हणुन लाचेची रक्कम देवतरसे यांचेसमोर धरून त्यांना मोजुन घेण्याबाबत विनंती केली असता देवतरसे यांनी लाचेची रक्कम स्विकारून दोन्ही हातांनी मोजुन त्यांचे समोरच्या टेबलवर ठेवुन दिली.त्यानंतर मी कार्यालयाच्या बाहेर येवुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला.त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे,सापळा पथक व पंच क्र.2 असे आले, पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. त्रिपुटे साहेबांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता मी खुर्चीवर बसलेल्या देवतरसे यांचेकडे बोट दाखवुन हे देवतरसे आहेत त्यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे समोरील टेबलवर ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र.2 च्या मदतीने सदर लाच रक्कम ताब्यात घेतली व सोबतच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने देवतरसे यांना ताब्यात घेतले.श्री.त्रिपुटे यांनी देवतरसे यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रदिप उर्फ विशाल विष्णु देवतरसे,वय 32 वर्षे धंदा खाजगी नोकरी,जी.के.एन्टरप्रायजेस कार्यालय, शॉप नं. 33,34, एमआर ट्रेड सेंटर, वाडियापार्क, अहिल्यानगर, रा. घर नं. 272, राजेश्वर सोसायटी,मोहिनीनगर,केडगाव, अहिल्यानगर असे सांगितले. देवतरसे याचे टोपन नाव विशाल व कागदोपत्री नाव प्रदिप असल्याचे समजले.श्री.त्रिपुटे यांनी देवतरसे यांना दळवी व प्रोप्रायटर श्री.कदम यांचेबाबत विचारले असता त्यांनी दळवी हे एमएसईबी च्या कार्यालयात गेले आहेत व कदम साहेब बाहेरगावी गेले आहेत असे सांगितले.त्यानंतर तेथे लाचेच्या नोटांच्या नंबरची खात्री करण्यात आली.त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी मला सदर कार्यालयीन कक्षाचे बाहेर उभे राहण्यास सांगीतले,सदर कक्षामध्ये देवतरसे यांच्या हाताच्या व लाच रकमेच्या तपासण्या केल्या.त्यानंतर मला कक्षात बोलवुन माझ्या हाताच्या व पॅन्टच्या खिशाच्या तपासण्या करण्यात आल्या.त्यावेळी देवतरसे यांनी माझ्या पैशांशी काही संबंध नाही. मी खाजगी कर्मचारी आहे.मला कदम साहेबांनी सांगितले म्हणुन मी पैसे घेतले आहे.मला यातील एक रूपया पण भेटणार नाही.सर्व पैसे हे कदम साहेबांसाठी आहेत.मी कदम साहेबांना फोन करून तुमची खात्री करून देतो असे म्हणुन त्यांनी जी.के.एन्टरप्रायजेसचे प्रोप्रायटर श्री.कदम यांना फोन लावला व आम्हांला ऐकविण्यासाठी फोनचा स्पिकर ऑन केला.देवतरसे यांनी ''खडका सेक्शन,नेवासा येथील किरण आरगडे आला आहे,त्याची ऑर्डर दयायची,तुम्ही म्हणले होते ते पंधरा हजार रूपये त्याने दिलेत,असे म्हणाले असता श्री.कदम यांनी '' दिले का त्यांनी,ऑर्डर देवुन टाक,लिस्ट बनव व्यवस्थित, कुठले कुठले पैसे दिलेत,असे म्हणाले.त्यावेळी सदरचे संभाषण पोकॉनिमसे यांनी व्हॉईस रेकार्डरमध्ये रेकॉर्ड केले. सदर संभाषणावरून श्री. कदम यांनी देवतरसे यांनी स्विकारलेल्या लाचेच्या रकमेस प्रोत्साहन देवुन संमती दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले.

थोडया वेळाने सदर कार्यालयात खाजगी कर्मचारी दळवी आले.मी श्री.त्रिपुटे यांना हे दळवी आहेत असे सांगितले.श्री.त्रिपुटे यांनी दळवी यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव विनोद बाबासाहेब दळवी, वय 28 वर्षे, धंदा खाजगी नोकरी, जी.के.एन्टरप्रायजेस कार्यालय, शॉप नं. 33,34, एमआर ट्रेड सेंटर, वाडियापार्क, अहिल्यानगर, रा. दळवी निवास, राम मंदिरामागे, भूषणनगर, केडगाव,अहिल्यानगर असे सांगितले.श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील कर्मचारी यांनी दळवी यांना ताब्यात घेतले.देवतरसे व दळवी यांना ताब्यात घेवुन श्री.त्रिपुटे व सापळा पथक ला.प्र.वि.कार्यालयाकडे निघाले. मला श्री.त्रिपुटे यांनी ला.प्र.वि.कार्यालयात येण्यास सांगितले.त्याप्रमाणे मी ला.प्र.वि.कार्यालयात आलो. सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 13/12/2024 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 12/53 ते 15/38 वा. दरम्यान जी.के. एन्टरप्रायजेस कार्यालय, वाडियापार्क, अहिल्यानगर या कार्यालयातील खाजगी कर्मचारी देवतरसे व दळवी यांनी माझ्याकडे माझा बाहयस्त्रोत यंत्रचालक म्हणुन नियुक्ती आदेश देण्याकरीता जी.के.एन्टरप्रायजेस चे प्रोप्रायटर श्री. कदम यांचेकरीता 15,000/-रु लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.17/12/2024 रोजी 15/13 ते 16/17 वा.दरम्यान जी.के.एन्टरप्रायजेस कार्यालयात खाजगी कर्मचारी देवतरसे यांनी माझेकडुन स्विकारली.तसेच देवतरसे यांनी प्रोप्रायटर कदम यांना फोन करून तुम्ही म्हणल्याप्रमाणे 15,000/- रूपये आरगडे याने दिलेत असे सांगितले असता कदम यांनी सदर लाच रक्कमेच्या स्विकृतीला प्रोत्साहन देवुन संमती दर्शविली असल्यामुळे माझी 1) प्रदिप उर्फ विशाल विष्णु देवतरसे, वय 32 वर्षे, धंदा खाजगी नोकरी, जी.के.एन्टरप्रायजेस कार्यालय,शॉप नं. 33,34, एमआर ट्रेड सेंटर, वाडियापार्क,अहिल्यानगर, रा. घर नं.272,राजेश्वरसोसायटी,मोहिनीनगर,केडगाव,

अहिल्यानगर, 2) विनोद बाबासाहेब दळवी, वय 28 वर्षे, धंदा खाजगी नोकरी, जी.के.एन्टरप्रायजेस कार्यालय, शॉप नं. 33,34, एमआर ट्रेड सेंटर, वाडियापार्क, अहिल्यानगर, रा. दळवीनिवास,राममंदिरामागे,भूषणनगर,केडगाव, अहिल्यानगर, 3) अंबादास मनोहर क्षत्रम, प्रोप्रायटर, जी.के. एन्टरप्रायजेस, एम.आर.ट्रेड सेंटर, वाडिया पार्क, अहिल्यानगर यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Pratap Pandurang Darade(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो. हे. कॉ./२२५१, वाय. डी. कवाडे
नेम. कोतवाली पो. स्टे., अहिल्यानगर

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Pratap Pandurang D
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): API